# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 30/06/2020 (मंगळवार)

(सकाळ)

### खून

पो.स्टे. सावनेर :- अंतर्गत 15 कि. मी अंतरावर मौजा पारधी बेळा मांडवी येथे दिनांक 28/06/2020 चे 17.15 वा. दरम्यान आरोपी नामे क्र. 1) मंजुकुमार मिजाजी चव्हाण, वय 25 वर्ष व 2) सावनकुमार अर्जुन राजपुत, वय 20 वर्ष, दोन्ही रा. परधी बेळा, मांडवी यांनी फिर्यादी नामे- राहुल रमेश राजपुत, वय 25 वर्ष, रा. मसखापरा, पो. ईसापुर, ता. काटोल यांचा भाऊ मृतक नामे- शेटकुमार रमेश राजपुत, वय 30 वर्ष, रा. पारधी बेळा मांडवी याच्याशी त्याच्या घरासमोरील रस्त्यावर लावलेल्या काटेरी कुंपनावरून वाद करून त्याला काठी व लोखंडी भाल्याचे पात्याने मारहाण करून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. करांडे 7722011228 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. जलालखेडा :- अंतर्गत 6 कि.मी अंतरावर मौजा इंदरवाडा येथे दिनांक 29/06/2020 चे 13:00 वा. ते 14:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे- मनोज विनायकराव गायनेर, वय 34 वर्ष रा. ईंदरवाडा ता. नरखेड, जि. नागपूर यांच्या राहत्या घराचे मागील दार अज्ञात आरोपीने फोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरामधील कपाटत ठेवलेले नगदी 10,000/- रू., सोन्याचे दागिने कि. 30,000/-रू. असा एकुण 40,000/-रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राजेन्द्र पेठे 9657332273 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. खापरखेडा :– मौजा चिचोली खापरखेडा येथे फिर्यादी भाऊ यांची 17 वर्षीय पिडीत मतीमंद अल्पवयीन बहीन हिला आरोपी नामे– जाकीर हुसेन दुधकनोजे, वय 55 वर्ष, रा. चिचोली खापरखेडा याने फिर्यादीच्या राहत्या घरी दार बंद करून जबरदस्तीने शरीर संबंध करतांना फिर्यादी याने पाहीले. दरम्यान आरोपीने 'सदर बाब सांगितल्यास घरातील कोणाला तरी मारून टाकीन' अशी फिर्यादीस धकमी देत तेथून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एल), 506 भादंवि. सहकलम 4, 5(के), 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक धुमाळ 9970848688 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर